**ठळक बातम्या**

- उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज नवी दिल्लीत नव्या संसद भवनात मतदान सुरू

- उपसा जलसिंचन योजनांसाठीच्या वीज दर सवलतीला मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज पंजाब आणि हिमाचल प्रदेशातल्या पूरग्रस्त भागाच्या दौऱ्यावर

- नेपाळमधे प्रधानमंत्र्यांसह अन्य ४ मंत्र्यांचे राजीनामे/ समाजमाध्यम बंदीविरुद्धच्या आंदोलनाला हिंसक वळण

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून संयुक्त अरब अमिरातीत प्रारंभ

**<><><><><>**

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज नवी दिल्लीत नव्या संसद भवनात मतदान सुरू आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सगळ्यात आधी मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, जितेंद्र सिंह, प्रल्हाद जोशी, राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश, माजी प्रधानमंत्री एच डी देवेगौडा, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राज्यसभा सदस्य अजित गोपछडे, अशोक चव्हाण यांनी मतदान केलं. इतर सदस्यही मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर पोहोचले आहेत. दुपारी १ वाजेपर्यंत सुमारे ६७ टक्के मतदान झालं. या निवडणुकीत मतदान न करायचा निर्णय बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती या दोन पक्षांनी घेतला आहे.

रालोआचे उमेदवार, महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन तर इंडिया आघाडीचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी आहेत.मतदानाची वेळ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असून मतमोजणी आजच होणार आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने नुकत्याच केलेल्या फेररचनेमुळे शेतीसाठी उपयुक्त अनेक वस्तूंवरच्या जीएसटी करात बदल झाला आहे. ऐकूया त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड- व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे**

*शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे अनेक बदल कररचनेत झाले आहेत. फक्त शेतात वापरले जाणारे ट्रॅक्टर्स, ट्रॅक्टरचे टायर्स आणि ट्यूब, ट्रॅक्टरला जोडल्या जाणाऱ्या ट्रॉलीचे टायर्स आणि ट्यूब यांच्यावरचा कर ५ टक्क्यांवर आला आहे. खत निर्मितीसाठी वापरले जाणारे काही पदार्थ, कीटकनाशकांचे घटक पदार्थ, कडुनिंबापासून तयार झालेली कीटकनाशकं, यांच्यावरचा जीएसटी १२ टक्क्यांवरुन उतरुन ५ टक्के झाला आहे. याविषयी ऐकूया परभणीचे शेतकरी विजय बनसोडे यांनी दिलेली प्रतिक्रीया…*

***बाईट- विजय बनसोडे***

*मात्र तंबाखू सेवनाला प्रोत्साहन मिळू नये या दृष्टीनं  पानमसाला, तंबाखूची इतर उत्पादनं , ई सिगरेटसारखी निकोटीन आधारित पण धूर न सोडणारी उत्पादनं यावरचा कर २८ टक्क्यांवरुन वाढवून ४० टक्के करण्यात आला आहे. याला अपवाद फक्त तेंदुपत्त्यापासून तयार होणाऱ्या विड्यांचा असून त्यावरचा कर १८ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे.* नवीन कररचना येत्या २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.

**<><><><><>**

उपसा जलसिंचन योजनांसाठीच्या वीज दर सवलतीला मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. अतिउच्चदाब, उच्चदाब, आणि लघुदाब उपसा जलसिंचन, अशा सर्व प्रकारच्या १ हजार ७८९ योजनांना वीज दरात सवलत मिळत असल्यानं या मुदतवाढीचा लाभ सर्व शेतकरी सभासदांना होणार आहे.

नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात हुडकोकडून २ हजार कोटी रुपयांचं कर्ज घ्यायलाही मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली.

**<><><><><>**

नमो शेतकरी महासन्मान किसान योजनेचा सातवा हप्ता आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबईतून वितरित झाला. राज्यातल्या साडे ९१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी २ हजार याप्रमाणे सुमारे १९०० कोटी रुपये जमा होतील. या सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या महिन्यांचे अनुदान लाभार्थ्यांना दिल जाईल.

**<><><><><>**

राज्याचं पहिलं बांबूविषयक धोरण येत्या १७ सप्टेंबरला जाहीर होईल असं उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काल रत्नागिरीत सांगितलं. बांबू शाश्वत पीक असून योग्य नियोजनासह बांबू लागवड केल्यास शेतकऱ्यांना दरमहा ३० ते ४० हजार रुपयांचं अतिरिक्त उत्पन्न मिळू शकतं असं ते म्हणाले. रत्नागिरी जिल्ह्यात किमान १० हेक्टरवर बांबू लागवड करण्याचा संकल्प असल्याचं त्यांनी सांगितलं. ते काल जिल्हास्तरीय बांबू लागवड आणि विकास परिषदेत बोलत होते.

**<><><><><>**

स्वातंत्र्य लढ्यात प्राणांची आहुती देणाऱ्या नंदुरबारमधल्या बाल हुतात्म्यांना आज त्यांच्या ८३व्या स्मृतीदिनानिमित्त मानवंदना देण्यात आली. नंदुरबार जिल्हा

प्रशासनासह, जेष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांनी शहीद स्थळावर जाऊन त्यांना अभिवादन केलं. यावेळी पोलीस दलातर्फे हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. चले जाव चळवळीत सहभागी झालेले शिरीषकुमार मेहता, लालदाद शहा, धनसुकलाल वाणी, शशीधर केतकर, घनश्यामदास शहा हे पाच जण इंग्रजांच्या गोळीबारात शहीद झाले होते.

<><><><><>

हिमाचल प्रदेश आणि पंजाब राज्यातल्या पूर स्थितीचा तसंच मदत कार्यांचा सविस्तर आढावा घेण्याकरता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज या दोन्ही राज्यांच्या दौऱ्यावर आहेत. हिमाचल प्रदेशातल्या आपद्ग्रस्त भागाची त्यांनी हवाई पाहणी केली. धर्मशाला इथे ते राज्य सरकारी अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय आढावा बैठक घेतील. त्यानंतर, पंजाबच्या पूरग्रस्त भागांचीही प्रधानमंत्री हवाई पाहणी करतील.

<><><><><>

मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. नवीनचंद्र रामगुलाम आणि त्यांच्या पत्नी वीणा रामगुलाम यांचं आज आठ दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी मुंबईत आगमन झालं. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी त्यांचं स्वागत केलं. मॉरिशसचे प्रधानमंत्री या दौऱ्यात, नवी दिल्ली इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन चर्चा करतील. वाराणसी, अयोध्या आणि तिरुपतीलाही ते भेट देणार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

नेपाळमधे समाज माध्यमांवरच्या बंदीविरोधात तरुणांच्या आंदोलनानं हिंसक वळण घेतलं असून तिथले प्रधानमंत्री के पी शर्मा ओली यांनी आज पदाचा राजीनामा राष्ट्रपतींकडे दिला. त्याआधी काल मोर्चावर केलेल्या गोळीबारात १९ जणांचा मृत्यू झाला होता, याची जबाबदारी घेत नेपाळचे गृहमंत्री रमेश लेखक यांनी

राजीनामा दिला. त्यांच्यासह आरोग्य मंत्री प्रदीप पौडेल, कृषी मंत्री रामनाथ अधिकारी, पाणीपुरवठा मंत्री प्रदीप यादव यांनीही राजीनामे दिले आहेत.

आज काठमांडू, पोखरा, इटहरी यासह अनेक शहरात संचारबंदी लागू करण्यात आली होती.

नेपाळमधे सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तिथे राहणाऱ्या **भारतीय** नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचं आणि नेपाळी प्रशासनानं दिलेल्या मार्गदर्शक सूचना पाळण्याचं आवाहन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा आजपासून संयुक्त अरब अमिरातीत सुरू होत असून अबूधाबी इथं होणाऱ्या पहिल्या सामन्यात अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात लढत होईल. भारताचा पहिला सामना उद्या दुबईत युएईच्या संघाशी तर येत्या १४ तारखेला पाकिस्तान बरोबर होणार आहे. येत्या २८ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटात भारत, पाकिस्तान, ओमान आणि यूएईचा समावेश आहे. तर ब गटात श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग आणि बांगलादेश यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

हाँगकाँग २०२५ च्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धा आजपासून सुरु होत आहेत. ऑलम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधूचा  भारताच्या वतीनं पहिला सामना डेन्मार्कच्या लाईन क्रिस्टोफर बरोबर खेळणार आहे. भारताच्या एच.एस.प्रणोय आणि आयुष शेट्टीसह पुरुष एकेरी विभागात लक्ष्य सेन सहभागी होणार आहे. पुरुष दुहेरीमध्ये सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचीही  निवड करण्यात आली आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या तारापूर औद्योगिक वसाहतीत काल संध्याकाळी एका औषध निर्मिती कंपनीमध्ये हायड्रोक्लोरीक गॅसची गळती झाल्यानं आसपासच्या परिसरात घबराट पसरली होती. वायुगळतीची माहिती मिळताच संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य ती कारवाई करुन गळती थांबवली. यावेळी परिसरात ४० पेक्षा जास्त कामगार काम करत होते. परंतु या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचं पोलीसांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या चांदवड इथल्या राहुड घाटावर काल रात्री बीपीसीसीएल गॅस कंटेनरचा अपघात झाल्यामुळे एलपीजी गॅसची गळती सुरू झाली आहे. त्यामुळे गॅस गळती थांबवण्यासाठी अग्निशमन दल घटनास्थळी पोहचलं असून सध्या राहुड घाटातील वाहतूक मनमाड आणि देवळा मार्गे वळवण्यात आली आहे.

**<><><><><>**

रायगड जिल्ह्यात उरण इथल्या ओएनजीसी प्रकल्पाच्या गॅंस प्रोसेसिंग विभागात काल स्फोट होऊन परिसरातल्या घरांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. गॅस पाईपलाईन गरम झाल्यानं ही दुर्घटना झाल्याचा अंदाज असून स्फोटानंतर आगीचे लोट पसरले होते. परिसरातल्या घरांना हादरे बसले, काचा, तावदाने फुटली.. मात्र सुदैवानं जिवितहानी झाल्याचं वृत्त नाही..

**<><><><><>**

ताजिकिस्तानमध्ये सुरू असलेल्या CAFA अर्थात मध्य आशियाई फुटबॉल संघटनेच्या फुटबॉल स्पर्धेत भारताने काल ओमानचा पराभव करून कांस्यपदक जिंकलं.

**//<><><><><>//**